# सूचना

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) २०२०-२१**

**परीक्षेसाठी ऑनलाईन E.O./E.I. लॉगीन करण्याबाबत सूचना**

खाली नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेसाठी E.O./E.I लॉगीन करण्यासाठी पुढील टप्पे आहेत.

## A. E.O. / E.I. Secondary नोंदणी फॉर्म

१. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in या संकेतस्थळाच्या Homepage वरील डाव्या बाजूस असलेल्या उपक्रम मधील E.O. / E.I. नोंदणी या Tab वर क्लिक करा.

२. E.O. / E.I. नोंदणीसाठी Click Here to Register या बटनावर क्लिक करा.

३. E.O. / E.I. Registration Form open होईल.

४. आपला जिल्हा Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

५. E.O. / E.I. नोंदणी फॉर्ममध्ये स्वत:चे, वडिलांचे/पतीचे नाव व आडनाव अचूकपणे नमूद करा. (Designation नमूद करण्याची आवश्यकता नाही.)

६. स्वत:चा मोबाईल नंबर (१० अंकी) अचूकपणे नमूद करा.

७. स्वत:चा Email ID अचूकपणे नमूद करा.

८. विज्ञान पर्यवेक्षक / सदर परीक्षेचे काम करणारे यांचे नाव नमूद करा. (प्रथम आडनाव नमूद करा.)

९. विज्ञान पर्यवेक्षक / सदर परीक्षेचे काम करणारे यांचा मोबाईल नंबर (१० अंकी) अचूकपणे नमूद करा.

१०. कार्यालयाचा पत्ता - ठिकाण/लँडमार्क, रस्ता, पेठ, गाव, तालुका, जिल्हा व पिनकोड (६ अंकी) या क्रमाने अचूकपणे नमूद करा.

११. कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक STD कोडसह अचूकपणे नमूद करा.

१२. कार्यालयाचा Email ID अचूकपणे नमूद करा.

१३. E.O. / E.I. / Personal Bank Account Holder Name या रकान्यात जर कार्यालयीन बँक खाते असेल तर त्याचे नाव नमूद करावे. अथवा खातेदाराचे नाव नमूद करावे. जेणेकरुन परीक्षेचे मानधन आपल्या खात्यावर पाठविणे सोयीचे होईल.

१४. वर नमूद केलेल्या खातेदाराच्या बँकेचे नाव, ब्रँचचे नाव, पत्ता, खाते क्रमांक व IFSC Code अचूकपणे नमूद करा.

१५. वरील सर्व माहिती योग्यरीत्या भरल्यानंतर Submit या बटनावर क्लिक करा.

१६. Submit बटनावर क्लिक केल्यानंतर आपणास वर नमूद केलेल्या वैयक्तिक Email ID व मोबाईलवर E.O. / E.I. लॉगीनचे User Name व Password प्राप्त होईल.

***

## B. E.O. / E.I. Secondary लॉगीन

१. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in या संकेतस्थळाच्या Homepage वरील डाव्या बाजूस असलेल्या उपक्रम मधील E.O. / E.I. नोंदणी या Tab वर क्लिक करा.

२. आपल्या वैयक्तिक Email ID व मोबाईलवर मिळालेल्या User Name व Password टाकून Sign in या बटनावर क्लिक करुन लॉगीन करावे.

३. लॉगीन केल्यानंतर E.O. / E.I. Dash Board दिसेल.

४. सदर E.O. / E.I. Dash Board वर तुम्हाला तुमच्या जिल्ह्यातील २०२०-२१ ची ऑनलाईन शाळा नोंदणी संख्या, विद्यार्थी नोंदणी संख्या व अपेक्षित वर्ग खोल्या संख्या तालुकानिहाय दिसतील.

५. विद्यार्थी नोंदणी पूर्ण झाल्यानंतर यथावकाश ऑनलाईन केंद्र निश्चिती करावयाची आहे.

६. E.O. / E.I. Dash Board वरील Reports या बटनावर क्लिक केल्यानंतर Dropdown मध्ये खालील प्रमाणे Report दिसतील.

   a. Taluka-wise Report

   b. School-wise Report

   c. Center list Report

   d. N-Form

   e. T-Form

### ६. a. Taluka-wise Report :-

१. या रिपोर्ट वर क्लिक केल्यानंतर आपल्या जिल्ह्यातील तालुकानिहाय व माध्यमनिहाय प्रविष्ठ विद्यार्थी संख्या दिसेल. सदरचे तालुके आपल्या जिल्ह्यातीलच आहेत याची खात्री करावी व नियमित आवेदनपत्र भरण्याची दिनांक संपल्यानंतर प्रिंट-आऊट काढून घ्यावी.

२. प्रत्येक तालुक्याच्या पुढे Details हा पर्याय देण्यात आलेला आहे. या पर्यायावर क्लिक केल्यानंतर तालुक्यातील शाळानिहाय प्रविष्ठ विद्यार्थी संख्या दिसेल. सदरच्या यादितील शाळा त्याच तालुक्यातील आहेत याची खात्री करावी व नियमित आवेदनपत्र भरण्याची दिनांक संपल्यानंतर प्रट-आऊट काढून घ्यावी.

३. प्रत्येक शाळेच्या पुढे Details हा पर्याय देण्यात आलेला आहे. या पर्यायावर क्लिक केल्यानंतर सदर शाळेतील प्रविष्ठ विद्यार्थी यादी दिसेल.

४. वरील अ.क्र. १ ते २ च्या सर्व तालुकानिहाय व शाळानिहाय प्रिंट-आऊट काढून घेतल्यानंतर यथावकाश Add Center या पर्यायावर जाऊन केंद्रनिश्चिती करण्यात यावी.

५. प्रत्येक केंद्रासाठी किमान १५० व जास्तीत जास्त ९६० विद्यार्थी असणे अपेक्षित आहेत. भौगोलिक परिस्थितीत व आदिवासी विभाग यांना सदरहू संख्या शिथिलक्षम असेल.

६. दोन तालुक्यांमध्ये एक केंद्र करताना संबंधित शाळेंचे केंद्रापर्यंतचे अंतर हे जास्तीत जास्त ५० ते ६० कि.मि. इतके असणे अपेक्षित आहे.

## ६. b. School-wise Report:-

१. या रिपोर्ट वर क्लिक केल्यानंतर आपल्या जिल्ह्यातील तालुका Dropdown लिस्ट मधून निवडावा.

२. तालुका निवडल्यानंतर सदर तालुक्यातील शाळा व प्रविष्ठ विद्यार्थी संख्या दिसेल.

## ६. c. Center List Report :-

१. या रिपोर्ट वर क्लिक केल्यानंतर आपल्या जिल्ह्यातील केंद्रांची यादी दिसेल.

२. सदरची यादी केंद्र निश्चित केल्यानंतर दिसेल.

## ६. d. Center List Report :-

१. या रिपोर्ट वर क्लिक केल्यानंतर आपल्या जिल्ह्यातील प्रविष्ठ शाळांची जातनिहाय विद्यार्थी संख्या दिसेल.

## ६. e. Center List Report :-

१. या रिपोर्ट वर क्लिक केल्यानंतर आपल्या जिल्ह्यातील केंद्रनिहाय व माध्यमनिहाय प्रविष्ठ विद्यार्थी संख्या दिसेल.

***

## C. केंद्र निश्चित करणे.

१. E.O. / E.I. Dash Board च्या उजव्या बाजूस असलेल्या Add Center या बटनावर क्लिक करावे.

२. प्रथम केंद्र म्हणून निवडलेल्या शाळेचा ११ अंकी UDISE Code अचूकपणे नमूद करावा.

३. शाळेचा ११ अंकी UDISE Code नमूद केल्यानंतर SARAL वरुन आलेली (Auto generate झालेली) शाळेची सर्व माहिती अचूक आहे याची खात्री करावी. जी माहिती आलेली नसेल/अपूर्ण असेल किंवा चुकीची असेल तर सदर माहिती Edit करुन अचूक नमूद करावी.

४. केंद्रावरच्या एकूण ब्लॉकची संख्या अचूकपणे नमूद करा. २४ विद्यार्थ्यांसाठी एक ब्लॉक या प्रमाणे ब्लॉकची संख्या अचूकपणे नमूद करावी.

५. शाळेच्या मुख्याध्यापकांचे पूर्ण नाव नमूद करावे.

६. मुख्याध्यापकांचा मोबाईल नंबर (१० अंकी) अचूकपणे नमूद करा.

७. मुख्याध्यापकांचा Email ID अचूकपणे नमूद करा.

८. वरील सर्व माहिती योग्यरीत्या भरलेली आहे. याची खात्री करुन Save या बटनावर क्लिक करावे.

९. Save या बटनावर क्लिक केल्यानंतर स्क्रिनवर your center details saved successfully चा massage येईल. OK या बटनावर क्लिक करा.

१०. वरील प्रमाणे आपल्या जिल्ह्यासाठी आवश्यक असणारे केंद्र निश्चित करण्यात यावेत.

***